# आवटे महाविद्यालयात चर्चासत्राचे पहिले पुष्प उत्साहात

**मंचर : पुढारी वृत्तसेवा**

मंचर (ता. आंबेगाव) येथील अण्णासाहेब आवटे कॉलेजमध्ये विज्ञान विभागाद्वारे आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे पहिले व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील माजी कुलगुरू प्रो. डॉ. आर. एस. माळी होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ. डी. पी. अमळनेरकर यांनी भूषविले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या इंटग्रेटिव्ह नॅनोटेक्नॉलॉजी परस्पेक्टिव फॉर मल्टिडिसिप्लिनरी ॲप्लिकेशन या विषयाची माहिती दिली. जगभरातून होणाऱ्या विविध संशोधनाची माहिती ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व्हावी, संशोधनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी हे चर्चासत्र व



**मंचर येथील आवटे महाविद्यालयात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. के. जी. कानडे.**

लेक्चर आयोजिण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी दिली.

चर्चासत्रासाठी ऑनलाइन पद्धतीने गृहमंत्री दिलीप वळसे-पाटील, समन्वय समितीचे सदस्य बाळासाहेब बेंडे-पाटील, बाळासाहेब बाणखेले, राजाराम बाणखेले, रयत शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. प्रा. आर एस. माळी यांनी पब्लिक लेक्चरमध्ये नवीन शैक्षणिक धोर २०२० या विषयावर विवेचन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ अमळनेरकर यांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे रिसर्च आ इनोव्हेशनचे नवीन शैक्षणिक धोरणातील महत्त्व याबाब माहिती दिली.

कार्यक्रमप्रसंगी जगभरातून ऑनलाइन पद्धती यूट्यूबवर व झूम ॲपवर विद्यार्थी, संशोधक, शास्त्रज्ञ व प्रमु पाहुणे, तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासा महाविद्यालयातील सर्व कर्मचारी, विभागप्रमुख, कार्यालयी अधीक्षक पारधी यांनी परिश्रम घेतले. प्रा. हेमांगी गावित एस. एम. शेख यांनी सूत्रसंचालन केले. चर्चासत्राचे निमंत्र डॉ. ए. बी. निकुंभ यांनी आभार मानले.

# आवटे महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय चर्चासत्र सुरू

**मंचर, दि. १९ (प्रतिनिधी)** - येथील अण्णासाहेब आवटे कॉलेजमध्ये विज्ञान विभागामार्फत आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे पहिले पब्लिक व्याख्यान ऑनलाइन झाले, अशी माहिती प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी दिली.

माजी कुलगुरू कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथील प्रोफेसर डॉ. आर. एस. माळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, तर अध्यक्षपदी डॉ. डी. पी. अमळनेरकर होते. प्रास्ताविकामध्ये प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या इंटग्रेटिव्ह नॅनोटेक्नॉलॉजी परस्पेक्टिव्ह फॉर मल्टी डिसिप्लिनरी अॅप्लिकेशन या विषयाची माहिती दिली. चर्चासत्रासाठी ऑनलाइन गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, समन्वय समितीचे सदस्य बाळासाहेब बेंडे पाटील, बाळासाहेब बाणखेले,राजाराम बाणखेले, रयत शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ. अमळनेरकर यांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे रिसर्च आणि इनोव्हेशनचे नवीन शैक्षणिक धोरणातील महत्त्व याबाबत माहिती दिली. जगातील सर्व विद्यापीठांचे उच्च शिक्षणात गेल्या पन्नास वर्षातील बदल व त्या तुलनेत भारत देशातील उच्च शिक्षणाची परिस्थितीचा आढावा सांगितला. कार्यक्रमासाठी सर्व स्टाफ, विभागप्रमुख, कार्यालयीन अधीक्षक पारधी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. हेमांगी गावीत व एस. एम. शेख यांनी केले. डॉ. ए. बी.निकुंभ यांनी आभार मानले.